# डॉ. कर्मवीर पाटील यांची जयंती साजरी

कांदिवली (बातमीदार) : कांदिवली पश्चिम चारकोप सेक्टर सातमध्ये, रयत शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालयात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती उत्साहाने साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन केले. ढोल-ताशांच्या गजरात व पारंपरिक वेशभूषेत पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या निमित्ताने चारकोप येथील वृद्धाश्रमात मोफत फळे वाटप करण्यात आली. विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या.

मनिषा म. परब
मो.नं. ९६१९६८७८१४

डॉ.मयुरी म. परब
मो.नं.९६१९०८६१३१

# होली लाईफ केअर एन्जल (वृध्दाश्रम)

रजि.नं. महाराष्ट्र स्टेट मुंबई १४७१ २०१७ जी.बी.बी.एस.डी.

प्रगती बंगला नं.६१, ज्ञान वर्धीनी मार्ग ज्ञान वर्धीनी विद्यालय जवळ,
चारकोप सेक्टर नं.०७,कांदिवली (प.)मुंबई ४०० ०६७
E-mail : parabmanisha22@gmail.com | Web : www.holylifecareangel.com


मनिषा म. परब
मो.नं. ९६१९६८७८१४
डॉ.मयुरी म. परब
मो.नं.९६१९७८६१३२
केअर एन्जल
दि २२/०९/२०२२







शैलेश जाधव



रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक व शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त गुरुवारी सकाळी कांदिवलीतील चारकोप येथील ज्ञानवर्धिनी विद्यालयात पालखी मिरवणूक काढण्यात आली. कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याची महती विद्यार्थी व समाजापर्यंत पोहोचवण्याच्या हेतूने रयत शिक्षण संस्थेच्या सर्व शाखांमधून हा सोहळा साजरा करण्यात आला.

# ज्ञानवर्धिनी विद्यालयात कर्मवीर जयंती संपन्न



■ मुंबई

रयत् शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची एकशे पस्तीसावी जयंती ज्ञानवर्धिनी विद्यालय चारकोप येथे मोठ्या उत्साहमध्ये पार पडली. विद्यार्थ्यांनी ढोल ताशांच्या गजरामध्ये आणि पावसाच्या मोठ्या सरी अंगावर झेलत कर्मवीर भाऊराव पाटील यांची पालखी मिरवणूक काढली. विद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून ते सेक्टर चार सेक्टर सात मधून पारंपारिक अशा वेशभूषेमध्ये इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी लेझीमच्या तालावर नाचत कर्मवीर अण्णांच्या घोषणा देत मोठ्या उत्साहामध्ये कर्मवीर अण्णांची पालखी मिरवणूक काढली. मिरवणुकीमध्ये शिक्षक, माजी विद्यार्थी संघटना आणि स्कूल कमिटी सदस्य यांनी भाग घेतला. जयंतीच्या निमित्ताने विद्यालयाने वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, इत्यादी अनेक स्पर्धांचे आयोजन केले होते. पालखी मिरवणुकीनंतर विद्यालयात विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच कर्मवीर जयंतीच्या निमित्ताने विद्यालयातर्फे होली लाईफ केअर एंजल या जवळच असणाऱ्या वृद्धाश्रमास भेट देऊन तेथील ज्येष्ठ नागरिकांना फळे, मिठाई आणि बिस्किटांचे वाटप केले. या वृद्धाश्रमाचे संचालक मनीषा परब व मनोहर परब यांनी वृद्धाश्रमात आलेल्या शिक्षकांचा सन्मानपत्र देऊन गौरव केला.

लोकमत

# डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील जयंती उत्साहात

**मुंबई :** पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३५ वी जयंती कांदिवली (प), चारकोपच्या रयत शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी आठ वाजता त्यांच्या प्रतिमेचे पूजन, तसेच पालखी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. ढोल-ताशांच्या गजरात व पारंपरिक वेशभूषेत मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीला स्कूल कमिटी सदस्य हणमंतराव नलावडे, महादेवराव भिंगार्डे, घनःशाम देटके, पालक वर्ग, शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका राधा संकपाळ, सर्व शिक्षक वर्ग, सेवक वर्ग, तसेच आम्ही स्वावलंबी प्रतिष्ठानच्या सल्लागार परिणिता माविनकुर्वे व सहसल्लागार अंजली चांदोलीकर, आदी उपस्थित होते.

Hello Mumbai
Page No. 2 Sep 23, 2022
Powered by: erelego.com

## संक्षिप्त



# कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त मिरवणूक

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कांदिवली (पश्चिम) येथील चारकोपमध्ये गुरुवारी ढोल-ताशांच्या गजरात व पारंपारिक वेशभूषेत पालखी मिरवणूक काढण्यात आली. रयत शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच पालखी मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले होते.

आम्ही स्वावलंबी प्रतिष्ठानच्या सल्लागार परिणिता माविन कुर्वे व सह सल्लागार अंजली चांदोलीकर उपस्थित होत्या. जयंतीचे औचित्यसाधून चारकोप येथील वृद्धश्रमात मोफत फळवाटप करण्यात आले. तसेच विविध स्पर्धा व उपक्रम हस्ताक्षर, घोषवाक्य, निबंध, वक्तृत्व स्पर्धा झाल्या. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा विजय असो, स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद आदी घोषणा देत पालखी मिरवणूक काढून परिसर दणाणून सोडला.यानंतर सर्व विद्यार्थ्यांना खाऊवाटप करून मिरवणुकीची सांगता झाली.

हणमंतराव नलावडे, महादेवराव भिंगार्डे, घन:शाम देटके, शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका राधा संकपाळ, मुख्याध्यापक डी. सी.गावीत, सरिता शिंदे तसेच शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि स्कूल कमिटी सदस्य जयवंतराव पिसाळ, मदनराव चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.



कांदिवली : ज्ञानवर्धिनी विद्यालयाच्या वतीने जंयती साजरी करण्यात आली.

# कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती साजरी

कांदिवली (बातमीदार) : चारकोप येथील ज्ञानवर्धिनी विद्यालयाच्या वतीने शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३६ वा जयंती सोहळा व पालखी मिरवणूक कार्यक्रम मोठ्या उत्साहाने पार पडला. यावेळी विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था म्हणून रयत शिक्षण संस्थेकडे पाहिले जाते. यावेळी ज्ञानवर्धिनी विद्यालयातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. सकाळी ८ ते ११ या वेळेत सेक्टर ४ व ७ मधून काढण्यात आलेल्या मिरवणुकीस नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याची महती विद्यार्थी व समाजापर्यंत पोचविण्याच्या हेतूने रयत शिक्षण संस्थेच्या सर्व शाखांमधून हा सोहळा साजरा करण्यात आला असल्याचे घनश्याम देटके यांनी सांगितले. मिरवणुकीस स्कूल कमिटी सदस्य हणमंतराव नलावडे, महादेव भिंगार्डे, मुख्याध्यापक राजाराम भोसले, परिणिता माविन कुर्वे, पालक व शिक्षक वर्ग आणि सेवक उपस्थित होते.

# डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त पालखी मिरवणूक

**मुंबई :**रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक व थोरशिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३६ व्या जयंतीनिमित्त मुंबईत शुक्रवारी पालखी मिरवणूक काढण्यात आली.कांदिवली (पश्चिम) चारकोप येथील ज्ञानवर्धिनी विद्यालयातील प्रांगणात हा सोहळा झाला.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याची महती विद्यार्थी व समाजापर्यंत पोहोचवण्याच्या हेतूने संस्थेच्या सर्व शाखांमध्ये हा सोहळा करण्यात आला. चारकोप सेक्टर ४ व ७ मधून ही मिरवणूक मार्गस्थ झाली. या मिरवणुकीत स्कूल कमिटी सदस्य हणमंतराव नलावडे, महादेव भिंगार्डे, मुख्याध्यापक राजाराम भोसले,आम्ही स्वावलंबी प्रतिष्ठानच्या सल्लागार परिणिता माविन कुर्वे, पालक यांच्यासह रयतप्रेमी, शिक्षक,सेवक यांचा सहभाग होता.

पुण्य नगरी

# शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती साजरी



**मुंबई** : कांदिवली (प.), चारकोप येथील ज्ञानवर्धिनी विद्यालयाच्या वतीने शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३६ वा जयंती सोहळा व पालखी मिरवणूक कार्यक्रम मोठ्या उत्साहाने पार पडला. या वेळी विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था म्हणजे रयत शिक्षण संस्था आहे. संस्थेचे संस्थापक व थोर शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३६ वा जयंती सोहळा शुक्रवार, २२ सप्टेंबर २३ रोजी दिमाखात पार पडला. चारकोप ज्ञानवर्धिनी विद्यालयातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. सकाळी ८ ते ११ या वेळेत सेक्टर ४ व ७ मधून काढण्यात आलेल्या मिरवणुकीस नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याची महती विद्यार्थी व समाजापर्यंत पोहोचवण्याच्या हेतूने रयत शिक्षण संस्थेच्या सर्व शाखांमधून हा सोहळा साजरा करण्यात आल्याचे घनश्याम देटके यांनी सांगितले.

Smart Mumbai Edition
Sep 24, 2023 Page No. 4
Powered by : eReleGo.com

# शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती साजरी



**मुंबई** : कांदिवली (प.), चारकोप येथील ज्ञानवर्धिनी विद्यालयाच्या वतीने शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३६ वा जयंती सोहळा व पालखी मिरवणूक कार्यक्रम मोठ्या उत्साहाने पार पडला. या वेळी विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था म्हणजे रयत शिक्षण संस्था आहे. संस्थेचे संस्थापक व थोर शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३६ वा जयंती सोहळा शुक्रवार, २२ सप्टेंबर २३ रोजी दिमाखात पार पडला. चारकोप ज्ञानवर्धिनी विद्यालयातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. सकाळी ८ ते ११ या वेळेत सेक्टर ४ व ७ मधून काढण्यात आलेल्या मिरवणुकीस नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याची महती विद्यार्थी व समाजापर्यंत पोहोचवण्याच्या हेतूने रयत शिक्षण संस्थेच्या सर्व शाखांमधून हा सोहळा साजरा करण्यात आल्याचे घनश्याम देटके यांनी सांगितले.